International Journal of Advance and Applied Research
www.ijaar.co.in
ISSN – 2347-7075 Impact Factor – 8.141
Peer Reviewed Bi-Monthly
Vol. 7 No. 2 January – February - 2026

# कवी नलेश पाटील यांच्या कवितेतील पर्यावरणीय जाणिवा

**गौरी अनिलकुमार कुंभार[1], प्रा. डॉ. श्यामसुंदर मिरजकर[2]**
[1]*संशोधक विद्यार्थिनी, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.*
[2]*मार्गदर्शक, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.*
*Corresponding Author – गौरी अनिलकुमार कुंभार*
**DOI - 10.5281/zenodo.18654240**

निसर्ग आणि मानव यांचे नाते अनादीकाळापासूनचे आहे. हे अतुट नाते मराठी साहित्यसंपदेमध्ये महानुभाव पंथ, संतसाहित्य ते आधुनिक मराठी साहित्यातही आढळून येते. निसर्ग घटकांचा आधार घेऊनच मानवाने आपले अस्तित्व टिकविले. निसर्गाला शक्ती, दैवत मानून निसर्गपूजा सुरू केली. आकाश, पर्वत, पठारे, मैदाने, महासागर, नद्या, वृक्ष-वल्ली, पशु-पक्षी, प्राणी इ.सजीव-निर्जीव नैसर्गिक घटकांचा समावेश पर्यावरणामध्ये होतो. या घटकांचा वापर संत साहित्यात प्रतिमा, प्रतीके व दृष्टांत रूपाने केलेला आढळतो. कोणतेही साहित्य नैसर्गिक पर्यावरणापासून अलिप्त करता येत नाही. त्यामधूनच मानवी संस्कृती आकार घेत असते. निसर्गसृष्टीविषयी असणारी ओढ संत ज्ञानेश्वर, संत तुकाराम, समर्थ रामदास, बहिणाबाई चौधरी, बालकवी, ना. धों. महानोर, इंद्रजीत भालेराव यांनी काव्यसृष्टीतून प्रकट केली.

मराठी साहित्यात निसर्गवर्णनपर कवितांमध्ये निसर्गाचे सुंदर वर्णन आलेले आहे; परंतु त्यामध्ये पर्यावरणीय भान दिसून येत नाही. नव्वदोत्तर कालखंडातील 'पर्यावरणविषयक प्रगल्भ जाणीव असणारा कवी' म्हणून नलेश पाटील हे नाव अग्रक्रमाने घेता येते. 'हिरवं भान' या काव्यसंग्रहाच्या मलपृष्ठामध्ये अशोक बागवे नलेश पाटील यांच्या कवितेबद्दल लिहितात, 'आजपर्यंतच्या मराठी कवितेला अनभिज्ञ अशी निसर्गप्रतिकांना चित्रदर्शी नि रंगदर्शी रूप देणारी अनोखी किमया नलेश पाटीलच्या कवितेने साधली आहे. निसर्ग हे त्याचे देऊळ! प्रतिमा हा गाभारा नि रंगकळा ही देवमूर्ती आहे.' या विधानावरूनच नलेश पाटील यांच्या कवितांचे महत्त्व अधोरेखित होते.

**नलेश पाटील परिचय (१९५४-२०१६) :**

'निसर्गात मुरलेला कवी' म्हणून त्यांची ओळख आहे. समुद्रकिनाऱ्यावर वसलेल्या 'अक्करपट्टी' (पालघर) या निसर्गरम्य खेड्यात त्यांचा जन्म झाला. बालपणापासूनच रानोमाळ भटकंती केली. त्यावेळी निसर्गाची विविध रूपे मनात कायमची कोरली गेली. ते उत्तम चित्रकार व उत्तम कवी होते. या दोहोंच्या सर्जनातूनच 'निसर्गकवी' म्हणून ते उमलले. काव्यरूपी फुलले. निसर्गाच्या चमत्काररूपांची वर्णने, सृष्टीच्या सृजनाची रूपे दर्शविण्याबरोबरच ते निसर्गविषयक हरवलेल्या संवेदनाही व्यक्त करतात. त्यासच आपण 'पर्यावरणीय जाणिवा' देखील म्हणतो. नुसते निसर्ग पर्यटन करून चालणार नाही, निसर्गाप्रति आदर, संवेदना तितकीच महत्त्वाची आहे, हे आपल्याला नलेश पाटील यांच्या कविता दाखवून देतात. 'कवितेच्या गावा जावे' या कार्यक्रमात या कवितांचे गायन केले जात असे. पाऊस, आभाळ, नदी, कौलारू डोंगर, फांदी, सावली, अंगण, झाड,

पान, माती, चांदणे, पाखरे, पाणवठा, ऊन, वारा, कळया, क्षितिज, सूर्य, वृक्षांचा बुंधा, मुंगी, पाखरांतील मातृत्व असे त्यांच्या कवितेचे अनेकविध विषय आहेत. निसर्गातील सूक्ष्म घटकांपासून ते आकाशासारख्या विस्तीर्ण घटकाचा त्यांच्या कवितेत सहज वावर आहे. मुंबईसारख्या नगरीत राहूनही बालपणीच्या निसर्गसंपन्न अनुभवामुळे त्यांनी निसर्गकविता लिहून पर्यावरणविषयक जाणीव, संवेदना व्यक्त केली आहे.

**नलेश पाटील यांच्या काव्यातील पर्यावरणीय जाणीव:**

पर्यावरणातील घटकांबद्दल कवीची कृतज्ञतेची भावना आहे. त्यांची कविता निसर्गाशी मैत्री घडवून आणणारी आहे. पाखरानांही त्यांच्या वाट्याचे आकाश मिळायला लावणारी आहे. मानवाने निसर्गात केलेला हस्तक्षेप त्यांची कविता आपणास दाखवते. नलेश पाटील यांच्या कवितांचे आशयद्रव्य पर्यावरण आहे. निसर्ग अनुभवता अनुभवता ते स्वतःच निसर्ग होऊन गेल्यासारखे कविता करतात,

पानांचे डोळे माझे
नजर ही ओली ओली
पापण्यांच्या झुडूपातून
गालावर सरकली
हिरवीगार सृष्टी माझी
हिरवीगार दृष्टी झाली... (पृ.५)

वृक्षांचा महिमा आपणास ते 'फांदीला मस्त धार आली' या कवितेतून सांगतात,

माझ्या झाडांची हिरवी
किती सांगू मी थोरवी
तुम्हा देऊन सावली
ऊन माथ्यास मिरवी...(पृ.९)

येथे वृक्षांच्या परोपकाराचे महत्त्व विशद करतात. वृक्ष पशुपक्ष्यांना निवारा प्रदान करतात. उदरभरणाचे कार्य करतात. स्वतः उन्हात तळपत राहतात ; मात्र इतरांना ते सावली देतात. वृक्षांची निस्वार्थी भावना येथे प्रकट केली आहे. अशा या परोपकारी वृक्षाची मनुष्यजात निष्ठुरपणे कत्तल करते. त्याविषयी ते म्हणतात,

त्यांची करूनी कत्तल तुम्ही थाटली शहरे
सुकुमार भुईवरी त्यांचे बकाल शहारे
काय पाप त्यांनी केले तुम्हा सावली देऊनी
अर्धी लाकडे त्यांचीही गेली सरण होउनी
पुढे लागणार नाही एक थेंबसुद्धा ओठी
खेळ सरतेशेवटी मांडा वाळवंटी काठी......(पृ.९)

वृक्षतोड व त्याचे भविष्यातील दीर्घकालीन नकारात्मक परिणाम याची जाणीव या ओळी आपल्याला करून देतात.

'माणूस जिथे रुजला' या कवितेत ते लिहितात,

माणूस जिथे रुजला;
तिथे झाड कधी रुजले नाही
वाळवंटाचे अंगण त्याचे
सावलीने भिजले नाही....(पृ.३६)

अत्यंत मार्मिक शब्दात मनुष्य प्रजातीवर ते ताशेरे ओढतात. आपल्या भारतीय निसर्गपूजक संस्कृतीचे दर्शन ते याच कवितेतून घडवतात, ते पुढील प्रमाणे :

कधी काळी होती
वृक्षवल्ली आम्हा सोयरी
घराघरापुढे होती
हिरवळीची पायरी
पानसुद्धा तोडण्यासाठी
तेव्हा कोणी धजले नाही..... (पृ.३६)

मानवी हस्तक्षेप झाला नाही असे ठिकाण पृथ्वीतलावर शोधूनही सापडणार नाही. आकाश, पाताळही मानवी हस्तक्षेप विरहित नाहीत. म्हणून ते म्हणतात की,

मानवी स्पर्श ना जेथे, असतील फुले-पाखरे
रानात अशा तू मजला, ईश्वरा जरा टाक रे
मी झाड होऊनी तेथे पसरीन आपले बाहू...(पृ.३७)

नलेश पाटील हे वृक्षांचा महिमा काव्यरचनेतून उत्कटतेने मांडतात. वृक्षांविषयीचा त्यांचा आदर व वृक्षप्रेम त्यातून व्यक्त होते. त्यांच्या कवितेतून झाड हेच गुरु आणि शिष्य दोन्ही भूमिका बजावताना दिसते.

अवर्षणाचे प्रमुख कारण मानवी हस्तक्षेपातच दडले आहे. त्यावर कवितेतून निर्भीडपणे प्रश्न विचारतात :

कुणी पुसल्या हिरव्या जागा
कुणी खोडल्या नदीच्या रेघा...(पृ.४३)

भूमीला पाण्यासाठी मुकावे लागते याचे खरे कारण मानवी अमानुषतेत आहे. मानवाने वृक्षतोड केली परिणामी भूगर्भातील जलसाठा नष्ट झाला. त्याचे भयावह परिणाम वृक्षांना भोगावे लागतात. भूमीलाही पाण्याविना भेगा पडतात. हे साधर्म्य ते काव्यरूपातून प्रकट करतात :

वठल्या झाडाखालूनी जेव्हा
पाहिले मी आभाळाकडे
वाळक्या फांद्या वाटल्या जणू
आभाळाला पडले तडे....(पृ.४३)

भारतीय संस्कृतीमध्ये वाद्यांचे विविध प्रकार आहेत. वाद्यांना जे कातडे लावले जाते ते प्राण्यांचे असते. त्यातलचं दिमडी हे एक वाद्य आहे. ज्याला घोरपडीची कातडी वापरली जाते. त्याचा संदर्भ पुढील कडव्यात आलेला आहे :

डिम डिम दिमडीला दिमडीला
थाप झणझणीत पडं
तिच्या पाठीला कातडं
मेली घोरपड त्यातून रडं....(पृ.९१)

मानवाने रस्ते विकासाच्या नावाखाली मोठमोठाले डोंगर-झाडी नष्ट केली. रेल्वेचे आगमन झाले. दळणवळण वेगवान झाले. वृक्षआवरण कमी झाल्यामुळे ऋतूबदल झाला. तापमानवाढ झाली. हे खालील कवितेतून निदर्शनास आणून देतात :

झुक झुक गाडी किंकाळी फोडी डोंगर जखमी आरपार....
आत काळोख साकळलेला बाहेर डोंगर कळवळलेला
तरीही तोडा आणि फोडा रोज एक नवी कपार
हिरवी झाडे शिल्लक थोडी पाऊस बसला मारून दडी
थंड हवेचे ठिकाण तरी घामाच्या सरी मुसळधार
(पृ.११५)

स्वार्थाने बरबटलेला माणूस निसर्गालाच कायमचे नष्ट करतो. आपण निसर्गातील एक घटक आहोत हे तो पूर्णपणे विसरला आहे. नदी-समुद्रातही दगडांचे भराव टाकून त्यांचे अस्तित्व नष्ट करत आहे. येथे भूतकाळात कशी परिस्थिती होती आणि वर्तमान कसा आहे याचे प्रचिती येते, ती पुढील प्रमाणे :

इथे एक नदी वाहायची,
आता तिथे वाहनांची ये-जा असते
नदीच्या तोंडचे पाणीच पळालंय
मला तर आता समुद्राचीही भीती वाटू लागलीय
माणूस काहीही करू शकतो
समुद्रातच समुद्राचे स्मारक बांधू शकतो.... (पृ.१२२)

औद्योगिक क्रांतीमुळे पर्यावरणविषयक समस्यांमध्ये वाढ झाली. मानवजात शाश्वत विकासाच्या गोष्टी करते, पण प्रत्यक्षात शाश्वत विकासासाठी कृती करताना दिसून येत नाही. याचे हे बोलके उदाहरण झाले. असे पर्यावरणातील नानाविध प्रश्न घेऊन नलेश पाटील यांची कविता आपल्यापुढे अवतरते. पर्यावरणीय कृतीशीलतेचे सजग भान वाचकांमध्ये निर्माण करते.

वास्तवाची दाहकता मांडण्याबरोबरच शाश्वत विकासही अत्यंत महत्त्वाचा आहे हे अधोरेखित करते. पर्यावरणातील प्रत्येक घटकांशी असलेले त्यांचे निकट सख्य दर्शवते. परिणामी निसर्ग सौंदर्याबरोबरच वाचकांच्या पर्यावरणीय जाणिवा सजग करण्यात नलेश पाटील यशस्वी झालेले पहावयास मिळतात.

कवी अशोक नायगावकर नलेश पाटील यांच्या कवितेबद्दल बोलतात, 'नलेशची कविता म्हणजे नुसतं निसर्गपर्यटन नाही, तर ती आपल्यातला कलावंत जागा करत जाते. संवेदना हरवलेल्या आपणा सर्वांना आणि काळाला नलेशची कविता 'हिरवं भान' देते.'

**संदर्भ :**

१. डहाके, वसंत आबाजी ; मराठी समीक्षेची सद्यस्थिती, प्रथम आवृत्ती, पॉप्युलर प्रकाशन, मुंबई, २०११

२. पाटील, नलेश दत्तात्रय ; हिरवं भान, प्रथम आवृत्ती, पॉप्युलर प्रकाशन, मुंबई, २०१८